| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education<br>S.R.No.832-A, Final Plot No. 178, 179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004. | | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे<br>स..नं.८३२ए, फायनल प्लॉट नं.१७८, १७९बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिट्युटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,<br>पुणे ४११ ००४. | |

Tel : Chairman(P):STD .(020)-25651751 Secretary(P):25651750&EPABX -25705000& Email : secretary.stateboard@gmail.com


तातडीचे
ईमेलद्वारे

क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती२३-२४/1366
पुणे ४११ ००४.
दिनांक – ०२ एप्रिल २०२४

प्रति,
विभागीय सचिव
सर्व विभागीय मंडळे.

विषय – सन २०२३-२४ मधील राज्यातील दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांची (इ.१०वी व इ.१२वी) परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेसाठी Online द्वारे माहिती सादर करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ –
१. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.३१/१०/२०२३
२. शासन निर्णय क्र.एससीवाय-२०२३/प्र.क्र.३७/म-७, दि.१०/११/२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/एसडी-५, दि.१ ऑगस्ट, २०१९
४. शा. शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण २०१९/प्र.क.र.४७/एसडी-५, दि.०३/०२/२०२०
५. शा.नि.क्र.एफईडी १५९२/१००२/(११३२)/साशि-५, दि.१८/१०/१९९३
६. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/११३१, पुणे ४ दि.१३/३/२०२४
७. अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघ, महाराष्ट्र यांचे पत्र.
८. क्र.रा.मं./टं.वि.परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती/२३-२४/१३०५, पुणे ४ दि.२६/३/२०२४
९. शाळांचे ईमेलद्वारे प्राप्त झालेले अर्ज दि.३०/३/२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, शासनाचे संदर्भीय क्र.१व २ च्या शासन निर्णयानुसार, टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त भागातील इ.१०वी व इ.१२वी च्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही राज्यमंडळ स्तरावरुन करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य ४० तालुके व याव्यतिरिक्त १०२१ महसूल विभागातील बाधित क्षेत्रातील सर्व माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना 'माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४' मधील परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या नियमित विद्यार्थ्यांची यादी इ.१०वीसाठी `http://feerefund.mh-ssc.ac.in' आणि इ.१२वीसाठी 'http://feerefund.mh-hsc.ac.in' ह्या लिंकवर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर लिंकवर दि.२८ मार्च, २०२४ पर्यंत माहिती सादर करण्याची दुस-यांदा मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, काही शाळांनी पात्र विद्यार्थ्यांची माहिती / यादी अंतिम करण्यासाठी मुदतवाढ मागणी केली आहे.

मुदतवाढीच्या अनुषंगाने, ज्या शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी यापूर्वी माहिती सादर केली आहे, तथापि मुदत संपुष्टात आल्याने ज्या विद्यार्थ्यांची माहिती अप्राप्त असल्याने सादर केली नाही, अशा माहिती अप्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती online द्वारे भरण्यासाठी, दि.३ एप्रिल, २०२४ ते दि.१२ एप्रिल, २०२४ या कालावधीमध्ये उपरोक्त link सुरु करण्यात येत आहे. याबाबत आपल्या कार्यकक्षेतील सर्व शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहीसाठी –
१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२.
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
३. मा.शिक्षण संचालक (योजना), मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.
४. विभागीय शिक्षण उपसंचालक - पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर / अमरावती / नाशिक / लातूर / कोल्हापूर / बृहन्मुंबई –
५. शिक्षणाधिकारी(माध्यमिक)- यांना कळविण्यात येते की, बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती शाळांना प्राप्त होण्यासाठी पाठपुरावा करावा.
६. श्रीमती योगिता देशमुख, कक्ष अधिकारी (SD-5), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२